आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
मंगळवार दिनांक २१ एप्रिल २०२६

ठळक बातम्या

1. नागरी सेवा दिनानिमित्त राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धेचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण.
2. शेतकऱ्यांनी शेतजमिनीची आपसी वाटणी केल्यानंतर मुद्रांक निबंधकाकडे ५०० रुपयांत वाटणीपत्र नोंदवता येणार.
3. वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर विदर्भातील शाळांच्या वेळेत बदल.
4. उद्या संपूर्ण विदर्भात तुरळक पर्जन्यमानाची शक्यता.

नागरी सेवा दिवस

सुशासन आणि राष्ट्र निर्माणाच्या दिशेनं काम करण्याच्या संकल्पाला अजून बळकट करण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज राष्ट्रीय नागरी सेवा दिवसानिमित्त पंतप्रधानांनी आपल्या याबाबतच्या संदेशात, राष्ट्रसेवा हाच विकसित भारताचा भक्कम पाया असल्याचं नमूद केलं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, तसंच केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज या दिनाच्या औचित्यानं नागरी सेवेत कार्यरत सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. या दिनाच्या औचित्यानं उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी आज नवी दिल्ली इथं नागरी सेवेतल्या अधिकाऱ्यांना संबोधित केलं. यावर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना विकसित भारत: नागरिक-केंद्रित शासन आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत विकास' ही आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रामाणिकता, कर्तव्यनिष्ठा आणि समर्पण भावनेनं देशाच्या प्रगतीसाठी कार्य करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांना नागरी सेवा दिनाच्या हार्दिक शुभेच्छा, असं मुख्यमंत्र्यांनी आपल्या याबाबतच्या संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान आणि स्पर्धा २०२५-२६ ची पारितोषिकं आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आली.

अर्थव्यवस्थेच्या आकाराचा विचार करता आता महाराष्ट्राची स्पर्धा आता देशातील अन्य कोणत्या राज्याशी नसून जागतिक आहे. महाराष्ट्र आता जगातील तिसावी मोठी अर्थव्यवस्था असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. अर्थव्यवस्थेच्या विकासाचा हीच गती

कायम राखल्यास आपण पुढच्या दोन ते तीन वर्षामध्ये यूएई आणि सिंगापूरला देखील अर्थव्यवस्थेच्या आकारात मागे टाकू शकतो, असं मुख्यमंत्री म्हणाले.

राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता

दरम्यान, ड्रोन आधारित देखरेख-डिजिटल डेटा मेंटेन्सस प्रणालीसाठी कृषी तसंच पदुम विभागास प्रथम क्रमांकांचा दहा लाखांचा तर कार्यालयीन कामकाजातील सुधारणेसाठी मराठी भाषा विभागाला सहा लाख रूपयांचा दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार सामान्य प्रशासन विभागाला प्रदान करण्यात आला. विभागीय स्तरावर तळोदा येथील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी यांना प्रथम क्रमांकाचा, जळगाव जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दुसऱ्या क्रमांकाचा तर वाशिम कृषी विकास अधिकारी यांना तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. महापालिका गटात 'कूल रूफ' संकल्पनेसाठी अमरावती, व्हॉट्सॲप आणि चॅटबॉटद्वारे सेवांसाठी छत्रपती संभाजीनगर स्मार्ट सिटी कार्पोरेशन तर ई- गर्व्हनन्साठी मीरा भाईंदर महापालिकेला अनुक्रमे पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकाची पारितोषिकं देण्यात आली.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतीच्या आपसी वाटणीची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यात आली असल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना महसूल खात्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाची त्यांनी माहिती दिली. पूर्वी शेतकऱ्यांना भाऊबंदकीत शेतीची वाटणी करून त्याचे नोंदणीकरण करण्यासाठी तहसीलदाराची पूर्वमान्यता घेणे आवश्यक होते. तहसीलदाराची मंजुरी मिळाल्याशिवाय दस्तऐवज नोंदवता येत नव्हता. मात्र, नव्या सुधारणेनुसार, शेतकऱ्यांनी आपसी वाटणी केल्यानंतर थेट मुद्रांक निबंधकाकडे जाऊन केवळ ५०० रुपयांत वाटणीपत्र नोंदवता येणार आहे. यासाठी कोणतीही अतिरिक्त फी आकारली जाणार नाही आणि तहसीलदाराकडे जाण्याची गरजही राहणार नाही. या निर्णयाची अंमलबजावणी तत्काळ सुरू झाल्याचं बावनकुळे यांनी सांगितलं.

शाळा वेळेत कपात

विदर्भात वाढत असलेल्या तापमानाची तीव्रता आणि उष्मालाटेचा इशारा लक्षात घेता नागपुरात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी शाळा, अंगणवाड्या यांच्या वेळा सकाळी ७ ते

१०-३० या दरम्यान ठेवण्याचे आदेश निर्गमित केले आहे. त्याचप्रमाणे अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी देखील जिल्ह्यातील सर्व शाळांच्या वेळेत कपात करण्याचे आदेश जारी केले असून, आता शाळा सकाळी ७ ते १० या वेळेतच भरतील. हा आदेश आज पासून 30 एप्रिल पर्यंत लागू राहणार आहे.

पासपोर्ट (पारपत्र) व्हॅन

वाशीम इथं फिरत्या पासपोर्ट अर्थात पारपत्र व्हॅन सेवेचं उद्घाटन क्षेत्रीय पासपोर्ट अधिकारी समीर डफाडे यांच्या हस्ते करण्यात आलं. यामुळे आता नागरिकांना पासपोर्ट काढण्यासाठी इतर जिल्ह्यांमध्ये जाण्याची गरज उरणार नाही. यापूर्वी वाशीम जिल्ह्यातील नागरिकांना पासपोर्टसाठी नागपूर, अकोला किंवा हिंगोली इथं जावं लागत होतं. या व्हॅनमधून नवीन पासपोर्टसाठी अर्ज करणे, नूतनीकरण करणे तसेच अन्य आवश्यक प्रक्रिया एकाच ठिकाणी पूर्ण करता येणार आहे. ही सेवा दर महिन्याला चार दिवस उपलब्ध राहणार असून, पहिल्या आणि तीसऱ्या आठवड्यात मंगळवारी आणि बुधवारी नागरिकांना सेवा दिली जाणार आहे. वाढती मागणी लक्षात घेऊन भविष्यात या सेवेचा कालावधी वाढविण्याचा विचार केला जाऊ शकतो, अशी माहिती डफाडे यांनी दिली.

युवा शक्ती जागर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज भारतीय जनता युवा मोर्चाच्या युवा शक्ती जागर यात्रेला सुरूवात झाली. युवा शक्तीला जागृत संघटीत करून राष्ट्रीय शक्तींचा जागर करण्यासाठी ही यात्रा महत्वाची असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. युवा शक्ती संघटीत करून एका दिशेने नेऊ शकलो तर महाराष्ट्रात मोठं परिवर्तन घडू शकेल. देशाचे संविधान आणि संविधानाप्रती समाजातील सर्व तरूणांना जागृत करण्याचे काम युवा शक्ती जागरच्या माध्यमातून होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. याप्रसंगी भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, युवा मोर्चाचे अध्यक्ष कृष्णराज महाडीक यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते.

गोपाळराव पाटील निधन

भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील यांचं आज लातूर इथं वृध्दापकाळानं निधन झालं. ते ९४ वर्षांचे होते. डॉ. गोपाळराव पाटील यांनी वैद्यकीय सेवेतून समाजकारणात प्रवेश करून राजकारणात सक्रीय भूमिका बजावली. १९९४ ते २००० या काळात भाजपचे राज्यसभा सदस्य म्हणून त्यांनी काम केलं. तसंच वाणिज्य, परराष्ट्र व्यवहार, रेल्वे यासारख्या महत्त्वाच्या संसदीय विषय समित्यांमध्ये योगदान दिलं. लातूर इथल्या शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या माध्यमातून त्यांनी सुरू केलेल्या लातूर पॅटर्न मधून अनेक गुणवान विद्यार्थी घडवले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. गोपाळराव पाटील यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

हवामान

विदर्भातील यवतमाळ आणि चंद्रपूर जिल्ह्यात आज वादळी पर्जन्यमानसह गारपीट होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे. याशिवाय नागपूर, वर्धा, अमरावती, बुलढाणा, वाशिम, गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. चंद्रपूर, गोंदिया आणि गडचिरोली मध्ये उद्या वादळी पर्जन्यमान कायम राहणार असल्याचा इशारा देण्यात आला असून उद्या संपूर्ण विदर्भात तुरळक पर्जन्यमानाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान आज अकोला इथं ४३ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं आहे.

आयपीएल क्रिकेट

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायजर्स हैदराबाद आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबाद इथं राजीव गांधी मैदानावर सायंकाळी साडे सात वाजता हा सामना खेळवला जाणार आहे.

पीआयबी फॅक्ट चेक

आठशे साठ रुपये करार शुल्क भरल्यानंतर प्रधानमंत्री मुद्रा योजनेतून सात लाख रुपये कर्ज मंजूर होत असल्याचा दावा, सरकारनं फेटाळला आहे. पत्र सूचना कार्यालय-पीआयबीच्या फॅक्ट चेक युनिटनं याबाबतचं पत्र बनावट असल्याचं स्पष्ट केलं आहे. मुद्रा योजनेतून वित्तीय संस्थांना

निधी देण्यात येतो आणि वित्तीय संस्थांकडून ते कर्जस्वरूपात लाभार्थ्यांना देण्यात येतं, असं पीआयबीनं स्पष्ट केलं आहे.

'युवा संवाद'

यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बचत भवन इथं 'युवा संवाद' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. स्पर्धा परीक्षा आणि करिअर मार्गदर्शनासाठी आयोजित या उपक्रमात आयपीएस रॉबिन बन्सल यांनी खासगी नोकरी सोडून यूपीएससीत यश मिळवण्याचा प्रेरणादायी प्रवास मांडला.

****